नवजीवन सेवाभावी संस्था, औसा, ता.औसा, जि.लातूर संचलित कै.संग्रामसिंह डोंगरे माध्यमिक विद्यालय, कोथाळे, ता.मोहोळ, जि.सोलापूर या शाळेचे, मौ.औसा, ता.औसा, जि.लातूर येथे स्थलांतराबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः माशास्थ ३३१९/प्र.क्र.४४५/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १७ सप्टेंबर, २०१९

वाचा :-

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांकः माशास्थ २०१२/(५९/१२)माशि-२, दिनांक ३१ जुलै, २०१३.

संदर्भ :- १) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे क्र.शिउसं/माध्य-३०३/शाळा हस्तांतरण/पुवि/२०१७/२४१, दिनांक १० जानेवारी, २०१७ चे पत्र.

२) विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांचे क्र.शिउसंला/मावि-१/२०१९-२०/३४६६, दिनांक २३ ऑगस्ट, २०१९ चे पत्र.

३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांचे क्र.जिपसो/शिक्षण/माध्य/५७२६/२०१९, दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ चे पत्र.

प्रस्तावना :-

नवजीवन सेवाभावी संस्था, औसा, ता.औसा, जि.लातूर संचलित कै.संग्रामसिंह डोंगरे माध्यमिक विद्यालय, कोथाळे, ता.मोहळ, जि.सोलापूर या मराठी माध्यमाच्या विनाअनुदानित माध्यमिक (इयत्ता ५ वी ते १० वी) शाळेचे, औसा, ता.औसा, जि.लातूर येथे स्थलांतर करण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

उपरोक्त शाळेचे व्यवस्थापकीय अडचणीमुळे स्थलांतर प्रस्तावित केले आहे. सदर शाळेचे वर नमूद ठिकाणी स्थलांतरास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे. :-

(१) सदर शाळेबाबत सरल, संच मान्यता, यु-डायस रिपोर्ट इ. माहिती भरून अंतिम करणे आवश्यक राहील.

(२) स्थलांतरीत शाळेची किमान पटसंख्येची अट कोणत्याही कारणास्तव शिथिल केली जाणार नाही.

(३) शासनाकडून शाळा, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, वेतन/वेतनेतर अनुदान, विद्यार्थी इ.संदर्भात वेळोवेळी विहित करण्यात येणारे अधिनियम, नियम, आदेश इ.चे पालन संस्थेने करणे आवश्यक राहील.

(४) शाळेच्या बाबतीत मुळ शासन परवानगीच्या व मान्यतेच्या कोणत्याही अटी व शर्तीमध्ये बदल होणार नाहीत.

(५) सदर शाळा मुळ ठिकाणी अनुदानाच्या ज्या तत्वावर कार्यरत होती, त्याच तत्वावर स्थलांतरीत ठिकाणी कार्यरत राहील.

(६) शासन निर्णय, दिनांक २८/०८/२०१५ मधील संचमान्यतेच्या सुधारीत निकषांनुसार तसेच, शाळांबाबत शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशानुसार अनुज्ञेय होणाऱ्या पदांइतके शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत राहतील व त्यापेक्षा जास्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत राहणार नाहीत, हे संस्थेवर बंधनकारक राहील तसेच, अनुज्ञेय पदांपैकी रिक्त पदे अतिरिक्त कर्मचाऱ्यांमधून भरण्याबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करणे अनिवार्य राहील.

(७) सदरहू स्थलांतरासंदर्भात शासनाकडे अथवा शिक्षण विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे कोणत्याही प्रकारच्या तक्रारी वा आक्षेप आल्यास किंवा स्थलांतरासंदर्भातील अटींचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास स्थलांतर रद्द करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांनी सदर शाळेच्या स्थलांतरास मान्यता देण्याबाबत ४ आठवडयात पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१७१७३१३७३०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.09.17 17:42:29 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
३) विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर
४) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर
५) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर
६) अध्यक्ष/ सचिव, नवजीवन सेवाभावी संस्था, औसा, ता.औसा, जि.लातूर
७) निवडनस्ती (एसएम-१).